मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » सोमवार, दि. 27 जुलै 2026 | पान- 1

## पवना धरण शंभर टक्के भरले; 15 टक्के पाणी कपात तातडीने रद्द करा : खासदार श्रीरंग बारणे

### धरणातून विसर्ग सुरू असतानाही शहरात अपुरा पाणीपुरवठा; टँकरवरील अवलंबित्व संपवून नागरिकांना मुबलक पाणी द्यावे, महापालिका प्रशासनाकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणारे मावळातील पवना धरण शंभर टक्के भरले असून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. नदी दुथडी भरून वाहत असताना १५ टक्के पाणी कपात कायम कशासाठी ठेवली आहे?, असा सवाल खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे. ही पाणी कपात तत्काळ रद्द करण्याची मागणी त्यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

'पवना धरण शंभर टक्के भरले असतानाही नागरिकांना वेठीस धरले जात आहे. १५ टक्के पाणी कपात कायम ठेऊन नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा घेण्यास भाग पाडले जात आहे. यातून टँकर लॉबीला पोसण्याचे काम महापालिका प्रशासन करीत आहे. शहरात अतिशय कमी दाबाने, अपुरा पाणीपुरवठा होत आहे. अनेक गृहनिर्माण संस्थांना आजही टँकरने पाणी




घ्यावे लागत आहे. संस्थांचा टँकरवर लाखो रुपयांचा खर्च होत असून आर्थिक भार सहन करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ३० ते ३५ टक्के पाणी गळती होत आहे. स्मार्ट मीटर बसविले, स्काडा प्रणाली आणली. अमृत योजनेअंतर्गत जलवाहिनी बदली, त्यानंतरही पाणी गळती, टँकर लॉबी रोखण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरल्याचा' आरोप खासदार बारणे यांनी केला.

'पवना धरणात शंभर टक्के पाणीसाठा झाला आहे. पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. रावेत बंधाऱ्यातून पूर्ण क्षमतेने पाणी उचलले जात आहे. असे असतानाही महापालिका प्रशासनाने स्वतःच्या चुका झाकण्यासाठी १५ टक्के पाणी कपात कायम ठेवली आहे. ही कपात नेमकी कशासाठी कायम ठेवली आहे, याचा शोध लावावा लागेल. धरणात, नदीत पाणी आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी तातडीने १५ टक्के पाणी कपात रद्द करावी. नागरिकांना मुबलक पाणी द्यावे'; अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

समन्यायी पाणी वाटपाचे कारण देत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू केला. तो साडेसहा वर्षांनंतरही कायम आहे. अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. भामा आसखेडचे पाणी येईपर्यंत एक दिवसाआडच पाणीपुरवठा सुरू राहणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

#### १५ टक्के पाणीकपात कायम

» पवना धरणातील पाणीसाठा ९४.९८ टक्के झाल्याने पिंपरी-चिंचवड शहरात १९ जूनपासून सुरू असलेली १५ टक्के पाणी कपात रद्द होण्याची अपेक्षा शहरवासीयांना होती. मात्र, ऑक्टोबरपर्यंत धरणात शंभर टक्के पाणीसाठा असेल तरच १५ टक्के पाणी कपात रद्द केली जाईल. अन्यथा ही पाणी कपात पुढे कायम राहील, असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

#### नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

» पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये; तसेच घाटमाथ्यावर पाऊस सुरू आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये सिग्नलवर नियम पाळणाऱ्यांनाच त्रास!

### लाल सिग्नलवर थांबलेल्या वाहनचालकांवर दबाव; महिला आणि ज्येष्ठ नागरिक त्रस्त, वाहतूक पोलिसांकडून कारवाईचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांनाच आता मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. सिग्नल लागल्यानंतर तेथे थांबवणाऱ्या वाहनचालकांना मागून येणाऱ्या काही वाहनचालक सतत हॉर्न वाजवणे, हातवारे करणे, ओरडणे आणि पुढे जाण्यासाठी दबाव टाकणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. त्यामुळे वाहतूक नियम पाळणारा चालकच अडथळा, अशी मानसिकता सर्रास बळावत



असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

सिग्नलवर थांबणे हा वाहतुकीचा मूलभूत नियम आहे. मात्र, शहरात आता नियम पाळणाऱ्यांनाच कर्कश्श हॉर्न वाजवणे तसेच शिवीगाळ करून वाहतूक नियम मोडण्यास उद्युक्त केले जाते. काही वाहनचालकांची ही वाढती मुजोरी वेळेत न रोखल्यास शिस्तीबरोबरच नागरिकांची सुरक्षितताही धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

लाल दिवा लागल्यानंतर समोरची वाहने थांबलेली असतानाही मागून कर्कश हॉर्नचा मारा सुरू होतो. काहीजण वाहन अगदी जवळ आणून पुढे जाण्याचा प्रयत्न करतात, तर काही चालक हातवारे करत किंवा शिवीगाळ करत नियम पाळणाऱ्यांवरच दबाव आणतात. एवढेच नव्हे, तर काहीजण सिग्नलचे उल्लंघन करून पुढे निघून जातात.

> सिग्नल तोडणे आणि विनाकारण हॉर्न वाजवणे हे दोन्ही प्रकार दंडनीय आहेत. अनावश्यक हॉर्न वाजविल्यास ५०० रुपये, तसेच सिग्नल तोडल्यास ५०० रुपयांचा दंड आहे. पुन्हा नियमभंग केल्यास वाढीव दंड आकारला जातो. मॉडिफाय केलेले प्रेशर हॉर्न लावणाऱ्या वाहनांवरही कारवाई करत आहोत. आम्ही सीसीटीव्हीच्या माध्यमातूनही कारवाई करत आहोत.
>
> - अमित डोळस, वरिष्ठ वाहतूक पोलिस निरीक्षक.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दिघीत भव्य रक्तदान महाशिबिर उत्साहात संपन्न

## आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता भोंगाळे-पाटील यांनी केले आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिघी येथील आंबेडकर उद्यान, विदर्भ मित्र मंडळ येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील यांच्या पुढाकारातून या स्तुत्य सामाजिक उपक्रमात भोसरी परिसरातील युवक, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान केले.





रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा सामाजिक संदेश जपत अनेक रक्तदात्यांनी या शिबिराच्या माध्यमातून समाजाप्रती आपली बांधिलकी दृढ केली, तर शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास आयोजकांच्या वतीने आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, सरचिटणीस विकास (भाऊ) डोळस, नगरसेवक सागर (भैया) गवळी, नगरसेवक जालिंदर (बापू) शिंदे, मंडलाध्यक्ष प्रमोद परदेशी, संजय पटणी, विदर्भ मित्र मंडळाचे अध्यक्ष अशोक भगत, ज्ञानेश्वर चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते कुलदीप (भाऊ) परांडे, माजी मंडलाध्यक्ष रवींद्र नांदुरकर, प्रभाग अध्यक्षा स्वाती शिर्के यांच्यासह मंडलाध्यक्षा रोहिणी ताई मांढरे, कल्पना धाडसे, दिपाली मोरे, स्वाती बागल, सुरेखा कोटगिरे, उषा सिनलकर, सुमित्रा वाघ अण्णा आणि मेघा ताथोड यांनी विशेष उपस्थिती लावून रक्तदात्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

उपस्थित मान्यवरांनी यावेळी रक्तदानाचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे आपत्कालीन परिस्थितीत अनेक गरजवंत रुग्णांना जीवनदान मिळण्यास मोठी मदत होते. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राबवण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला नागरिकांकडून मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आयोजकांनी सर्व रक्तदाते, उपस्थित मान्यवर, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांचे आभार मानले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये कचरा व्यवस्थापनाला नवा वेग; 10 क्षेत्रीय कार्यालयांत अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांची तयारी

## मोशी कचरा डेपो बंद झाल्यानंतर पालिकेची हालचाल; बायो-सीएनजी, प्लास्टिक प्रक्रिया आणि सुका कचरा पुनर्निर्मितीसाठी 40 जागांचा शोध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील दहा क्षेत्रीय कार्यालयात प्रत्येकी एक कचरा प्रक्रिया केंद्र असे एकूण दहा केंद्र पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी शहरातील ४० जागांचा शोध क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यातून योग्य जागा निश्चित केल्या जाणार आहेत. घरगुती ओला कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मिती, प्लास्टिक बाटल्यापासून कच्चा माल तयार करणे, सुका कचऱ्यापासून पुनर्निर्माण असे केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.



मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा नाहक बळी गेला. तर, काही कर्मचारी जखमी झाले. त्या दुर्घटनेपासून तेथे कचरा वाहनांची वाहतूक बंद झाली आहे. सतरा दिवस उलटूनही डेपो बंद असल्याने शहरात कचराकोंडी निर्माण झाली आहे. शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग दृष्टीस पडत आहेत.

मोशी कचरा डेपोवरील ताण कमी करण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिकेच्या सर्व दहा क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्र तीन महिन्यात सुरू करण्याची ग्वाही १५ जुलैच्या सर्वसाधारण सभेत दिली होती. त्यासाठी ठोस तसेच, प्रसंगी कठोर भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सर्व दहा क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंत्यांची बैठक घेऊन त्यांना तात्काळ जागा शोधण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात सरासरी चार जागा शोधण्यात आल्या आहेत. एकूण ४० जागांचा शोध पूर्ण करण्यात आला आहे. त्या ठिकाणी घरगुती ओला कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मिती, प्लास्टिक बाटल्यापासून कच्चा माल तयार करणे, सुका कचऱ्यापासून पुर्ननिर्माण असे प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत.

बायो-सीएनजी प्रकल्पासाठी ५ ते १० एकर जागा निश्चित करण्यात आली आहे. तर, सुका कचरा प्रक्रिया केंद्रासाठी एक एकर इतकी जागा पुरेशी आहे. तर, प्लास्टिक बाटल्यावर प्रक्रिया करण्याचे केंद्र शहरात निवडक ठिकाणी सुरू केले जाणार आहेत. कचरा प्रकल्प सुरू करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### सल्लागार नियुक्तीसाठी महापालिकेकडून निविदा प्रक्रिया सुरू

**» शहरात दहा ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे बायो-सीएनजी केंद्र तसेच, इतर कचरा प्रकल्प सुरू करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची निविदा महापालिकेच्या आरोग्य विभागाने शनिवार (दि. २५) प्रसिद्ध केली आहे. दहा वर्षांसाठी सल्लागार नेमला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे नियोजन व व्यवस्थापन करणे,डीपीआर तयार करणे, निविदाप्रक्रिया राबवणे, देखरेख व दस्तऐवजीकरण करणे, महापालिकेच्या कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक तांत्रिक व व्यवस्थाकीय सहाय्य घेणे आदी कामे सल्लागारांला करावी लागणार आहेत. त्यासाठी पात्र एजन्सींकडून ३१ जुलैपर्यंत प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.**

### कचरा प्रक्रिया केंद्र पीपीपी तत्त्वावर सुरू करणार

**» शहरात एकूण ४० जागांचा शोध घेण्यात आला आहे. जागेचे क्षेत्र आणि लोकवस्ती अशी यादी तयार करण्यात आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बायो-सीएनजी प्रकल्प, प्लास्टिक बाटल्यांपासून कच्चा माल तयार करणे, सुका कचरा प्रक्रिया केंद्र व इतर प्रकल्प उभारले जाणार आहेत. योग्य जागी योग्य प्रकल्प राबवले जाणार आहेत. एकाही प्रकल्पातून दुर्गंधी येणार नाही. ते प्रकल्प पीपीपी तत्त्वावर राबण्याचे नियोजन आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले.**

# महापालिकेच्या 32 जागांवर पीएमपीचा दावा!

## पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांची महापालिकेच्या खास सभेत 24 आरक्षित जागा तातडीने देण्याची मागणी.

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महापालिकेच्या विकास आराखड्यात राखीव असलेल्या ३२ जागा म्हणजे सुमारे ९० एकर क्षेत्र असलेल्या जागांमधील पीएमपीला २४ जागा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी महापालिकेच्या खास सभेत केली. त्यानंतर या, जागांची सद्यःस्थिती आणि त्या कशा पद्धतीने ताब्यात घेणे शक्य आहे की नाही याचा अहवाल पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पुढील ३० दिवसांत तयार करणार आहेत.

पीएमपीच्या खास सभेत व्यवस्थापकीय संचालक आव्हाड यांनी सादरीकरण केल्यानंतर माजी सभागृह नेते धीरज घाटे यांनी पीएमपीसाठी किती जागा विकास आराखड्यात राखीव आहेत आणि किती जागा मिळाल्या आहेत. तसेच, मिळालेल्या किती जागांचा वापर व्यावसायिक वापरासाठी करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित केला. यावेळी आव्हाड यांनी महापालिकेच्या विकास आराखड्यात सुमारे ३२ जागा आरक्षित असून,

त्याचे एकूण क्षेत्र ९० एकर जागा आहे. या जागांचा माहिती घेतली असून, त्यातील २४ जागा तातडीने हव्या असल्याचे सांगितले. तसेच, या जागा खासगी असून, त्या ताब्यात घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असून, या जागा महापालिकेने ताब्यात घेऊन पीएमपीला हस्तांतरित कराव्यात अथवा पीएमपीला पैसे दिल्यास पीएमपी त्या ताब्यात घेईल, असे सांगितले.

यावेळी सभागृहनेते गणेश बिडकर यांनी असा कोणताही अधिकार पीएमपीला नाही. या जागा डीपीतील असल्याने त्या महापालिकेलाच ताब्यात घ्याव्या लागतील. तसेच, त्याची माहितीही प्रशासनाकडेच आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनीच याबाबत आरक्षित जागा आणि त्यांची सद्यःस्थिती याबाबतचा अहवाल ३० दिवसांत तयार करून याबाबत पीएमपीची संयुक्त बैठक घ्यावी, अशा सूचना केल्या आहेत.

पीएमपीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी नवीन डेपो, व्यावसायिक जागा आणि प्रवासी सुविधा विकसित करण्याची गरज असल्याचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी स्पष्ट केले. राखीव जागांचा योग्य वापर झाल्यास बससेवा विस्तार, देखभाल सुविधा आणि महसूल वाढीस मदत होईल. सभेत नगरसेवकांनीही पीएमपीच्या दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्याची भूमिका मांडली. यामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.



### ३० दिवसांत अहवाल तयार होणार

**» महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पीएमपीसाठी राखीव जागांची सद्यस्थिती तपासून ३० दिवसांत सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या अहवालात प्रत्येक जागेची मालकी, भूसंपादनाची स्थिती, उपलब्धता आणि हस्तांतरणाची शक्यता नमूद केली जाणार आहे. अहवालानंतर महापालिका आणि पीएमपीची संयुक्त बैठक घेऊन पुढील निर्णय घेतला जाणार आहे. यामुळे पीएमपीच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

### पीएमपीसाठी ३२ जागांचा आराखडा

**» पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यात पीएमपीसाठी ३२ जागा राखीव असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे ९० एकर आहे. पीएमपी प्रशासनाने यापैकी २४ जागा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या जागांचा वापर बस डेपो, टर्मिनस, पार्किंग व प्रवासी सुविधांसाठी होणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र बहुतांश जागा खासगी मालकीच्या असल्याने भूसंपादनासाठी मोठा निधी आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेने जागा संपादित करून पीएमपीकडे हस्तांतरित कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.**

### आर्थिक सक्षमीकरणावर भर

**» पीएमपीची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी नवीन डेपो, व्यावसायिक जागा आणि प्रवासी सुविधा विकसित करण्याची गरज असल्याचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी स्पष्ट केले. राखीव जागांचा योग्य वापर झाल्यास बससेवा विस्तार, देखभाल सुविधा आणि महसूल वाढीस मदत होईल. सभेत नगरसेवकांनीही पीएमपीच्या दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्याची भूमिका मांडली. यामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.**

# पुण्यात 'स्वच्छता सप्ताह'चा वेग; कसबा पेठेत महापालिकेची विशेष 'डीप क्लीन ड्राइव्ह'

## मंडई, बाजारपेठा, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक परिसराची सखोल स्वच्छता; नागरिकांना स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या 'स्वच्छता सप्ताह' अभियानांतर्गत शनिवारी कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत विशेष 'डीप क्लीन ड्राइव्ह' राबविण्यात आली. या मोहिमेत प्रमुख मंडई, बाजारपेठा, व्यावसायिक क्षेत्रे, शासकीय इमारती, आरोग्य कोठ्या तसेच क्षेत्रीय कार्यालय परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली.

दिवंगत लोकनेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शहरभर सुरू असलेल्या 'स्वच्छता सप्ताह' उपक्रमाचा भाग म्हणून परिमंडळ क्रमांक पाच अंतर्गत ही मोहीम राबविण्यात आली. महापौर मंजुषा नागपुरे आणि महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली, तर घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त संतोष वारुळे आणि परिमंडळाचे उपआयुक्त माधव जगताप यांच्या नेतृत्वाखाली मोहिमेचे नियोजन करण्यात आले.

या अभियानात प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मधील प्रमुख मंडई, व्यापारी संकुले, शासकीय कार्यालये, आरोग्य केंद्रे आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता करण्यात आली. मोहिमेदरम्यान नगरसेवक विशाल धनवडे, पल्लवी जावळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

तसेच खड्डा गेरेज परिसरात वृक्षारोपण आणि शालेय विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटपही करण्यात आले. स्वच्छता मोहिमेत प्रभाग २२ मधील गिरिधर भवन चौक, प्रभाग २३ मधील नेहरू चौक मंडई, भोरी आळी व परिसर, तसेच प्रभाग २४ मधील ऐतिहासिक कसबा गणपती मंदिर परिसर, गणेश रोड आणि प्रमुख रस्त्यांची विशेष स्वच्छता करण्यात आली.

या उपक्रमामुळे कसबा पेठेतील प्रमुख चौक आणि बाजारपेठा अधिक स्वच्छ झाल्याची प्रतिक्रिया नागरिक आणि व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. शहर अधिक सुंदर आणि कचरामुक्त करण्यासाठी नागरिकांनीही स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. मोहिमेच्या अंमलबजावणीत आरोग्य विभागाचे अधिकारी, निरीक्षक आणि मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते.



### नागरिकांच्या सहभागावर महापालिकेचा भर

**» महापालिकेने शहर स्वच्छ ठेवण्यासाठी केवळ प्रशासन नव्हे, तर नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. कसबा पेठेतील प्रमुख चौक, मंडई आणि बाजारपेठांची स्वच्छता झाल्यानंतर व्यापारी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शहरातील प्रत्येक परिसर कचरामुक्त ठेवण्यासाठी स्थानिक नागरिक, व्यापारी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. स्वच्छता सप्ताहासारख्या मोहिमा नियमितपणे राबवून स्वच्छ, निरोगी आणि सुंदर शहर घडविण्याचा महापालिकेचा संकल्प असल्याचे प्रशासनाने नमूद केले.**

# पुणे जिल्ह्यातील 62 हजार शेतकऱ्यांचे 523 कोटींचे कर्ज माफ; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची माहिती

**पुणे जिल्ह्यातील 62 हजार शेतकऱ्यांना तब्बल 523 कोटी रुपयांची कर्जमाफी मिळणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केली.**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्तीचा लाभ जिल्ह्यातील ६१ हजार ९०० शेतकऱ्यांना होणार असून त्यांचे प्रत्येकी दोन लाख रुपये असे एकूण ५२३ कोटी रुपयांचे कर्ज माफ होणार असल्याची माहिती राज्याच्या उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार असून कर्जमाफीच्या याद्या अद्ययावत झाल्यानंतर या योजनेतील खातेदार शेतकऱ्यांची संख्या आणि योजनेची व्याप्ती वाढेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (पीडीसीसी) वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजने'चे उद्घाटन सुनेत्रा पवार यांच्या हस्ते शुक्रवारी गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झाले. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे यावेळी उपस्थित होते.

त्या म्हणाल्या, 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजने'अंतर्गत जिल्हा बँकेच्या माध्यमातून एक हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शेती व्यवसायात तंत्रज्ञानाची आवश्यकता ओळखून शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात ५०० कोटींची तरतूद केली होती.



## 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना'

» पीडीसीसी बँकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजने' अंतर्गत १,००० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शेतीला चालना देणे, उत्पादनवाढ, पाणी बचत आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. ऊस शेतीसह विविध पिकांमध्ये एआयचा वापर वाढल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.

## कर्जमाफीचा मोठा दिलासा

» राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील ६१,९०० शेतकऱ्यांचे कर्ज माफ होणार आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार असून, जिल्ह्यासाठी एकूण ५२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कर्जमाफीच्या याद्या अद्ययावत झाल्यानंतर लाभार्थींची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून नव्याने शेती उभी करण्यासाठी मदत होणार आहे.

## विषमुक्त शेतीवर भर

» कार्यक्रमात कृषी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी रासायनिक खतांच्या अतिवापराबाबत चिंता व्यक्त केली. रासायनिक खतांमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे सांगत विषमुक्त अन्नधान्य उत्पादनावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत सेंद्रिय आणि शाश्वत शेतीकडे वळावे, असेही आवाहन करण्यात आले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून शेती अधिक सक्षम आणि टिकाऊ करण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# 'बीएलए' नियुक्तीतही महायुतीची 'आघाडी'; 'एसआयआर' प्रक्रियेत जिल्ह्यात युतीकडून 17 हजार, तर आघाडीकडून 7 हजार जणांची नियुक्ती

**पुणे जिल्ह्यात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षण (SIR) मोहिमेत महायुतीने महाविकास आघाडीवर मात करत बाजी मारली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत (एसआयआर) सर्व मतदारांची नोंद मतदारयादीमध्ये व्हावी, यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्यामध्ये महायुतीनेच आघाडी घेतली आहे. प्रशासनाच्या सहकार्यासाठी महायुतीने १७ हजार, तर महाविकास आघाडीने ७,८८४ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती केली आहे. महायुतीमध्ये भाजपनेच नियुक्त केलेल्या 'बीएलए'ची संख्या सर्वाधिक ७,८०६ इतकी आहे.

'एसआयआर'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदारयादी त्रुटीमुक्त आणि अचूक तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार येत्या ८ ऑगस्टपर्यंत केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करणार आहेत. जिल्ह्यातील ९० लाख ८० हजार १७३ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून, त्यासाठी जिल्ह्यात ८ हजार ४१७ मतदान केंद्रांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (बीएलओ) नियुक्ती करण्यात आली असून, विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (बीएलए) नियुक्ती करण्याचे आवाहन निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र, त्यामध्ये राजकीय पक्षांची उदासीनता जिल्हा प्रशासनाच्या निवडणूक शाखेकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाली आहे.

राजकीय पक्षांकडून जिल्हा प्रशासनाला २४ हजार ८८४ 'बीएलए' देण्यात आले आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७ हजार ८०६ जणांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार) ५ हजार ६६७, तर शिवसेना (शिंदे) ३ हजार ५२७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. महायुतीमधील या तिन्ही पक्षांनी मिळून १७ हजार नोंदणी केल्याचे दिसून येत आहे. तर महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार) २ हजार ९५७, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेसकडून अनुक्रमे २ हजार ४४५ आणि २ हजार १७३ जणांची नियुक्ती केली आहे. मनसेकडून अवघ्या ३२९ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे.



## ग्रामीण भागाची आघाडी

» 'एसआयआर'मध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण भागाने आघाडी घेतली आहे. त्या तुलनेत शहरी भागात हे प्रमाण कमी आहे. शहरी भागातील मतदारांचे पत्ते अचूक नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्याउलट, ग्रामीण भागातील मतदारांचे पत्ते कायम असल्यामुळे या मोहिमेला ग्रामीण भागात गती मिळाली आहे.